नियमित फौजदारी खटला क्र. ३१४/२०२१
(सरकार – वि – शिवहरी कमाले)
निशाणी क्र. १७.

**शासनातर्फे सा.क्र.०१ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | जितेंद्र बाबारावजी बोढे, |
| वय | – | ३१ वर्षे, |
| व्यवसाय | – | हातमजूरी, |
| रा. | – | खानगाव, ता. सावनेर, जि. नागपूर. |

**सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांचे मार्फत**

०१. मी आरोपीला ओळखता, तो माझ्या घराजवळ राहतो. सन २०२१ मध्ये माझे आरोपीसोबत झगडा भांडण झाले होते. त्यामुळे मी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविली, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर मला माहित नाही. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर मला माहित नाही.

**साक्षीदार आपल्या पुर्वीच्या जबाबापेक्षा विसंगत सांगत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासात अनुज्ञेय असणारी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी मंजूर.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०५/२०२१ रोजी ६.०० ते ६.३० वाजताच्या दरम्यान मी माझे वडीलांना भेटण्यासाठी खापरखेडा येथे गेलो असता त्यांनी मला सांगितले की, आरोपीने त्यांच्यासोबत भांडण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी आरोपीकडे विचारणा केली असता, आरोपीने

मला शिवीगाळ करुन दगडाने मारुन मला जखमी केले, तसेच माझ्या छातीच्या उजव्या बाजूला चावा घेतला, त्यामुळे पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली, ती पोलीसांनी वाचून दाखवली, ती बरोबर असल्यामुळे मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**०३. सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीतर्फे–श्री. एन.बी.बिहोने, वकील.**

**०४. नाकारला.**

माझ्या समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.02.13 12:42:27 +0530

(प्रदिपसिंह पी. ठाकूर)

दिनांक– १३/०२/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
[न्यायालय क्र.०१], सावनेर

# C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this P. D. F. File is word to word as per original."

Name of Stenographer : S. A. Misal